

FINAL LAYOUT PLAN FOR RESIDENTIAL USE AT CITY SURVEY No.411, KHASARA No. 237, MOUZA, CHINCHBHUWAN, NAGPUR

AREA STATEMENT	
LAND UNDER LAYOUT	= 0.90 HEC
IN SQ.MTS	= 9000 SQ.MTS
DEDUCTION OF DP ROAD (30M AND 12M)	= 2536.62 SQ.M
HOLDING AREA	= 6463.38 SQ.M
OPEN SPACE	= 970.47 SQ.M
(OPEN SPACE 15% OF 6464.36 = 969.507 SQ.M)	
PLOTABLE AREA	= 5492.91 SQ.M
AREA OF PLOT NO-1	= 3705.69 SQ.M
AREA OF PLOT NO-2	= 1787.22 SQ.M

CLIENT:
Shri. APPASWAMI INFRASTRUCTURE
TROUGH P...
1) SUNIL CHAUDHARI
2) VIVEK CHAUDHARI
ARCHITECT

नागपूर महानगर पालिका, नागपूर

(नगर रचना विभाग)

पहिला माळा, नारंग टॉवर, पाम रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर–440 001, दुरध्वनी क्र. 0712–2567017,
फॅक्स क्र. 0712–2561584, वेबसाईट – www.nmc.org.in

क्रमांक. – मनपाना/नरवि/अभि. मंजुरी/अंतिम/15 दि. –13/03/2012

प्रति,

श्री. अप्पास्वामी इंफ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार
1) श्री. सुनिल चौधरी, 2) श्री. विवेक एस. चौधरी.
चिंचभुवन, नागपूर.

विषय :– खसरा क्र. 237, नगर भुमापन क्र. 411, मौजा– चिंचभुवन, येथील रहवासी वापराच्या 9000 चौ.मी. क्षेत्रफळाच्या जागेवरील रहिवासी वापराकरीता अभिन्यासाला अंतिम मंजुरी देण्याबाबत.

संदर्भ:– तत्वतः मंजुरी अभिन्यास नकाशा क्र. मनपाना/नरवि/अभि. मंजुरी/04 दिनांक 20/08/2011.

वरील विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की खसरा क्र. 237, नगर भुमापन क्र. 411, मौजा– चिंचभुवन, येथील 9000 चौ.मी. क्षेत्रफळाच्या जागेवरील रहिवासी वापराकरीता अभिन्यासाला खालील शर्ती व अटिंच्या अधिन राहून अंतिम मंजुरी देण्यात येत आहे.

1) आपण महानगरपालिकेशी दिनांक .... ला केलेल्या करारनाम्यातील सर्व अटी बंधनकारक राहतील.

2) आपणास अभिन्यासातील जलवाहीनी, रस्ते, मलवाहीका व स्टॉर्म वॉटर ड्रेनचे आराखडे संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता व झोनल अधिकारी(स्वास्थ)) यांचेकडुन मंजूर करुन घ्यावे लागतील.

3) अभिन्यासाच्या नकाशामध्ये दर्शविलेल्या खुल्या जागेचा विकास, करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे करुन सदर विकास नागपूर शहराकरीता मंजुर विकास नियंत्रण नियमावली नियम क्र. 13.3 चे अधिन राहील व विकसीत खुली जागा महानगरपलिकेला हस्तांतरीत करणे व कागदोपत्री महानगरपालिकेच्या नावे करुन देणे बंधनकारक राहील.

4) सदरील अभिन्यास रहिवासी वापराकरीता मंजुर करण्यात आला आहे. व यामधील बांधकाम परवानगी नागपूर शहराकरीता मंजुर प्रचलित विकास नियंत्रण नियमावली नुसार अनुज्ञेय राहील.

5) सदरील जमीनीचा रहिवासी वापराकरीता महसूल विभागाचा अकृषक आदेश प्राप्त करणे आवश्यक राहील.

सहपत्र:– अंतिम मंजुर नकाशा.

सहाय्यक संचालक
नगर रचना
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी :– 1) अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर.
2) सहा. आयुक्त / वार्ड अधिकारी, लक्ष्मीनगर झोन क्र.1.

NIYAJI SIR / GENERAL LETTERS/ TATWATA MANJURI ANTIM MANJURI FOLD LAYOUT